मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 19 जून 2025 | पान- 1

# संतपीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवतील

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संत तुकाराम महाराज संतपीठ येथे कलादालन व सभागृहाचे लोकार्पण

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपली संस्कृती, संतांचे विचार, परंपरा जगापर्यंत पोहोचविण्यासाठी आधी ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ येथे शिक्षण, प्रशिक्षण देण्यात येणार असून येथे शिकणारा विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

श्रीक्षेत्र टाळगाव, चिखली येथे वारकरी संप्रदायासोबत अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था विकसित केलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या कलादालन व सभागृहाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, संतपीठाचे संचालक डॉ. सदानंद मोरे, चिंतन समिती, संतपीठ समितीचे पदाधिकारी तसेच पालक प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संतपरंपरा लाभलेली आहे. संतपरंपरा जपण्याचे काम संतपीठात होणार आहे. या ठिकाणाला वैश्विक स्वरुप देण्याचे काम करण्यात आले असून येथे संपूर्ण संतसाहित्य सीबीएसई अभ्यासक्रमाच्या माध्यमातून संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या चारही भाषांमधून शिकविले जाणार आहे. विविध वाद्य वाजविण्याचे प्रशिक्षणही याठिकाणी देण्यात येणार आहे.

ते म्हणाले, संतपीठाने तयार केलेल्या यापुढील संकल्प आराखड्यानुसार पंढरपूर व आळंदी येथे उभारण्यात येणाऱ्या संतपीठाला महाराष्ट्र शासन पूर्णपणे मदत करेल. सगळ्या ठिकाणचे संतपीठ एकमेकांना पूरक बनविण्यात येतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषेला ज्ञानभाषा बनविण्याचा मार्ग खुला केला असून मराठीला वैश्विक



भाषा, ज्ञानभाषा व अर्थकारणाची भाषा बनविण्याचे दालन खुले केले आहे. हे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारले असून सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले. इतर भारतीय भाषेचा तिरस्कार करणे योग्य नाही, असेही ते म्हणाले.

संतपीठाचे संचालक डॉ. मोरे म्हणाले, संत परंपरा जपणारी शाळा स्थापन करण्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केले आहे. संतांचे विचार या संतपीठाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम होणार आहे. विकसित भारताच्या ध्येयपूर्तीसाठी संतपीठाचा मोलाचा सहभाग असेल. संतपीठ समितीच्या यापुढील संकल्पास शासनाने आवश्यक ती मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ चिखली येथे संत मल्हारपंत कुलकर्णी गायन कक्ष, संत सोनबा ठाकूर पखवाज कक्ष, पंडीत अरविंद मुळगावकर तबला कक्ष तसेच आलीजाबहाद्दर ह.भ.प. महादजी शिंदे सभागृहाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण व पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत चालू वर्षात सुमारे १ लाख ५० हजार देशी वृक्ष लागवड करण्यात येणार असून त्याचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वारकरी संप्रदायासोबत अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था विकसित करण्याचा महत्वाकांक्षी उद्देशाने टाळगाव चिखली येथे २३ कोटी ५४ लाख रुपये खर्चाच्या 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ' विकसित केले आहे. यामध्ये तळमजला तसेच ५ मजले असे इमारतीचे नियोजन करण्यात आले असून त्याचे एकूण बांधकाम क्षेत्र १३ हजार १६१ चौरस मीटर आहे. या इमारतीमध्ये ५५ वर्गखोल्या, ९ कार्यालये, ४० इतर खोल्या ज्यामध्ये प्रयोगशाळा, संगणक कक्ष, सभागृह, संगीत तथा वाद्य कक्ष आहेत. प्रत्येक मजल्यावर स्वछतागृहे, विद्यार्थ्यांना खेळण्याकरिता विस्तीर्ण मैदान आदी सुविधा आहेत.

### समुहशिल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**» तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे आळंदी पालखी मार्गावर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उभारलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या भेटीचे समूहशिल्प आणि संतसृष्टीचे लोकार्पण करण्यात आले. या संतसृष्टीत विविध संतांच्या जीवनावर आधारित विविध भित्तीचित्रे बसविण्यात आली आहेत. संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपान महाराज, संत निवृत्ती महाराज, संत मुक्ताबाई व इतर वारकरी २० असे एकूण २५ शिल्पे मिश्र धातूमध्ये बनविण्यात आली आहे. सदर जागेत विविध संतांच्या जीवनातील प्रसंगांवर आधारित एकुण ४७ कांस्य धातुच्या शिल्पांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. या कामावर ३० कोटी ६९ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे.**

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा 340 वा पालखी प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३४० वा पालखी प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावामध्ये संपन्न झाला. तुकोबांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. पावसाच्या आगमनात पालखीचे प्रस्थान ठेवले. पालखीचा आजचा मुक्काम इनामदार वाड्यात असेल. उद्या ही पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल.

देहूतून बाहेर पडताच अनगडशहा बाबा या ठिकाणी पालखीची पहिली आरती होईल. ज्ञानोबा- माऊली तुकारामाच्या गजरात वारकरी पंढरपूरच्या दिशेने एक- एक पाऊल टाकतील. त्यानंतर जगतगुरु तुकोबांची पालखी उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरातील आकुर्डीतील विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल.



टाळ-मृदुंगाच्या गजरात हजारो भाविक देहूत दाखल झाले असून मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावामध्ये तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. सोमवारपासूनच देहू नगरीत शेकडोच्या संख्येने वारकरी दाखल झाले होते. आज सकाळी इंद्रायणी नदीमध्ये पवित्र स्नान करून वारकऱ्यांनी तुकोबांचे दर्शन घेतलं. पहाटेपासून विधिवत पूजा, आरती नंतर या सोहळ्याची सुरुवात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाली. पालकमंत्री अजित पवार यांनी आधीच देहू मंदिरात भेट देऊन तुकोबांच दर्शन घेतलं. मावळचे खासदार श्रीरंग बारणे, सुनेत्रा पवार, आमदार सुनील शेळके यांची देखील उपस्थिती होती. वर्षातून एकदा येणाऱ्या या आषाढी वारीसाठी देहू, आळंदीमध्ये हजारो वारकरी दाखल होतात. ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरामध्ये देहभान हरपून टाळ-मृदंगाच्या तालावर स्वतःला झोकून देतात. फुगडी, भगवी पताका घेऊन एक- एक दिंडी मंदिरातून पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# पाणीवापराच्या बिलाची ‘रंगीत तालीम’

## महापालिका आयुक्तांच्या मान्यतेनंतर नागरिकांना देणार ‘डमी बिल’

**पुणे | प्रतिनिधी**

समान पाणी पुरवठा योजनेतंर्गत नागरिकांना त्यांच्या पाणी वापराचे बिल समजावे आणि नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी महापालिकेने ‘डमी बिल’ देण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी महापालिका आयुक्तांसमोर ठेवण्यात आला असून, त्यांच्या मान्यतेनंतर त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.शहरातील प्रत्येक भागातील नागरिकांना पुरेशा दाबाने आणि एकसमान पाणी मिळावे, यासाठी सात वर्षांपूर्वी समान पाणीपुरवठा योजना राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.



या योजनेला त्यावेळी महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे. या योजनेत मीटरने पाणी दिले जाणार असल्याने पाण्याचा वापर कोणत्या भागांत किती होतो, हे निश्चित होणार आहे. मीटरने पाणी दिले जाणार असल्याने किती पाणी वापरले जाते, याची माहिती नागरिकांना व्हावी. तसेच, त्यासाठी किती बिल येणार आहे, याबाबत जागृती करण्यासाठी महापालिकेने नागरिकांना ‘डमी बिल’ पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेच्या वतीने दिले जाणारे हे ‘डमी बिल’ नागरिकांना प्रत्यक्ष भरायचे नाही. पण, या बिलामुळे नक्की पाणी वापर किती केला जातो, याबद्दल माहिती समजणार आहे. डमी बिलामुळे पाण्याची बचत होण्यास मदत होणार असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. पाणीवापराचे ‘डमी बिल’ पाठविण्यासाठी मान्यता मिळावी, असा प्रस्ताव पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तयार केला आहे. तो अंतिम मान्यतेसाठी आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे पाठविला आहे. या योजनेच्या माध्यमातून शहरातील विविध भागांत एक लाख ८० हजार पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. निवासी आणि व्यावसायिक मीटरचा यामध्ये समावेश आहे. ज्या भागांत ९० टक्क्यांपेक्षा अधिक पाणी मीटर बसविले गेले आहेत. तेथे पाण्याची डमी बिले पाठविले जाणार आहेत. यामुळे नागरिकांना ते वापरत असलेल्या पाण्याची माहिती मिळणार असल्याचे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

> “ पाण्याचा वापर किती होतो, हे समजावे यासाठी पाण्याचे डमी बिल पाठविले जाणार आहे. हे बिल नागरिकांनी प्रत्यक्ष भरायचे नाही. मात्र, अशा बिलाची सवय व्हावी, पाणीवापराबाबत जनजागृती होण्यासाठी हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. आयुक्तांच्या मान्यतेनंतर त्याची अंमलबजावणी होईल.
>
> **- प्रसन्नराघव जोशी, अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी महापालिकेची तयारी पूर्ण

## निगडी येथील आगमनाच्या ठिकाणी आरोग्य विभागाकडून चोख व्यवस्था

**पिंपरी | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्याच्या स्वागताची पिंपरी चिंचवड महापालिकेने जोरात तयारी केली आहे. पालखी सोहळ्यातील लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य, वैद्यकीय, पाणी पुरवठा, अग्निशामक आदी विभाग सज्ज झाले आहेत. निगडी येथील प्रवेशद्वारावर पालखीचे स्वागत करण्यापासून ते आकुर्डी येथील मुक्कामासह दुसऱ्या दिवशी दापोडी येथे पालखीचे प्रस्थान होईपर्यंत या मार्गावर ठिकठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. तर संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी आळंदी - दिघी मार्गावर सेवा देण्याची पूर्वतयारी झाली आहे.



संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या निगडी येथील आगमनाच्या ठिकाणी आरोग्य विभागाकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे. स्वागत कक्षाच्या परिसरात पालखी सोहळ्यादरम्यान रस्त्यावर टाकल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या, केळीच्या साली, खाद्य पदार्थांची पाकिटे, यूज अँण्ड थ्रो पाकिटे आदी कचरा उचलण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. सफाई कामगार, कचरा वेचक हे पालखी सोहळ्यातील शेवटचा वारकरी मार्गस्थ होईपर्यंत स्वच्छतेची देखभाल करणार आहेत. आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरातील मुक्कामाच्या ठिकाणी तसेच परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी ५० हून अधिक सफाई कामगार नेमण्यात आले आहेत.

**वारकऱ्यांसाठी सोयी-सुविधा..**

शाळेत वारकऱ्यांची राहण्याची व्यवस्था. स्वच्छता देखील चोखपणे केली जाणार

शाळेच्या ठिकाणी पाणी पुरवठा विभागाकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

दुसऱ्या दिवशी वारकऱ्यांच्या अंघोळीसाठीही पाण्याची सोय

आकुर्डी, चिंचवड, पिंपरी, नाशिक फाटा, फुगेवाडी, दापोडी पालखी मार्गावर एक किलोमीटर अंतरावर महिला आणि पुरुषांसाठी स्वच्छतागृहाची वेगवेगळी व्यवस्था.

संत ज्ञानेश्वर माऊली पालखी मार्गावर आळंदी ते दिघी दरम्यान फिरती स्वच्छतागृहे, ठिकठिकाणी पाण्याचे टँकर

### ठिकठिकाणी वैद्यकीय पथकांची नेमणूक

» वैद्यकीय विभागाने निगडी येथील स्वागत कक्षापासून ते दापोडीपर्यंत प्रत्येक चौकात डॉक्टर, नर्स यांची पथके कार्यरत ठेवली आहेत. वारकऱ्यांना आरोग्य विषयक वैद्यकीय सेवा त्वरित देता यावी, यासाठी विभाग प्रमुखांनी सर्व पथकांना आदेश दिले आहे. आकुर्डी येथील मुक्कामी एक रुग्णवाहिका आणि डॉक्टरांचे पथक तैनात केले आहे. त्याचबरोबर आकुर्डी येथील खंडोबा माळ, चिंचवड, पिंपरी, नाशिक फाटा, फुगेवाडी, दापोडी सीएमई येथे वैद्यकीय पथके कार्यरत केली आहेत. तुकोबा आणि माऊली दोन्ही पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना तपासणी करुन औषधे विनामूल्य दिली जाणार आहेत.

> “ संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊली या दोन्ही पालखी सोहळ्यांतील सहभागी वारकऱ्यांना सेवा देण्यासाठी ठिकठिकाणी डॉक्टरांची पथके कार्यरत राहणार आहेत. वारकऱ्यांची तपासणी करुन त्यांना औषध पुरवठा केला जाणार आहे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय विभाग.**

# आकुर्डी पालखी मुक्कामावरील अतिक्रमणावर महापालिकेची कारवाई

## आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिर परिसरातील टपऱ्या, शेड हटवले

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पालखी मुक्कामी असणा-या आकुर्डी गावठाण विठ्ठल मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणावर कारवाई केली आहे. सार्वजनिक रस्ते, मंदिर परीसर व वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत टपऱ्या, पत्र्याचे शेड यावर दोन दिवस शनिवारी (दि.१४) सकाळपासून जेसीबी व गॅस कटरच्या सहाय्याने कारवाई करण्यात आली.

आषाढी वारी पालखी सोहळ्यात हजारो भाविक पिंपरी-चिंचवड शहरात येत असतात. राज्यभरातून आलेल्या भाविकाची आकुर्डीत संत तुकाराम महाराज पालखीचा पहिला मुक्काम असतो. या भागातून हजारो भाविकांची वारी विठ्ठल मंदिराकडे मार्गस्थ होत असते. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व वाहतुकीस अडथळा होऊ नये म्हणून ही महापालिकेकडून ही कारवाई करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार श्री विठ्ठल मंदिर परिसरातील संत तुकाराम महाराज पालखी तळावरील अतिक्रमण काढण्यात आले. यापुर्वी देखील अनेक वेळा येथील अतिक्रमण काढण्यात आले होते. विठ्ठल मंदिरापासून जवळच असलेल्या भाजी मंडई मध्ये गणपती, नवरात्र, दसरा, दिवाळी, होळी, गुडी पाडवा व आकुर्डी गावची यात्रा यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे स्थानिक व्यापारी व हातगाडी, पथारी व्यावसायिकाकडून अतिक्रमण केले होते.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी अखंडपणे श्री विठ्ठल मंदिर आकुर्डी येथे मुक्कामास येत आहे. गेल्या काही वर्षांपासून पालखी तळावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्यामुळे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या वारकरी व भाविक भक्तांचे आणि दर्शनास येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होवू लागली होती.

तसेच स्थानिक नागरिकांकडून पालखी मुक्काम दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचा मुद्दा वेळोवेळी उपस्थित केला जात होता. यासाठी पर्यायी जागेचा शोधही सुरू होता. परंतु, आकुर्डी पालखी मुक्कामाची कित्येक वर्षांची परंपरा अबाधित राहावी यासाठी आयुक्त शेखर सिंह यांनी १५ दिवसापूर्वी पालखी तळाची पाहणी केली. पालखी तळावरील व मार्गावरील अतिक्रमण लवकरात लवकर काढण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने स्थानिक पोलीस बंदोबस्तासह शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई केली. काही व्यावसायिकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी प्रसंगावधान राखत कारवाई सुरळीत पार पाडली.




### सातत्यपूर्ण कारवाईची मागणी

» ही कारवाई एकदाच न करता सातत्याने व्हावी आणि सार्वजनिक जागांचा वापर नागरी सुविधांसाठीच व्हावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. आगामी वारीच्या पार्श्वभूमीवर अशा नियोजनबद्ध कारवायांमुळे भाविकांच्या सुरक्षेला आणि वाहतुकीस पूरक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

### स्थानिक नागरिकांचे समर्थन

» अनेक स्थानिकांनी या मोहिमेचे स्वागत केले. "दरवर्षी अतिक्रमणांमुळे पालखी मार्गावर चालणे ही कठीण होते. यंदा महापालिकेने वेळेवर हस्तक्षेप करून योग्य निर्णय घेतला आहे," अशी प्रतिक्रिया स्थानिक रहिवाशांनी दिली.

> महापालिकेच्या पालखी तळावर अतिक्रमण केल्यास यापुढे देखील कारवाई करण्यात येईल. ही कारवाई केवळ आकुर्डीपुरती मर्यादित नसून, अन्य अतिक्रमित भागांमध्येही येत्या काही दिवसांत टप्प्याटप्प्याने कारवाई केली जाणार आहे.
> - मनोज लोणकर, उपायुक्त, अतिक्रमण विभाग, महानगरपालिका.

# मामुर्डी-सांगवडे लोखंडी पूलही धोकादायक

## पुलावरून दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहने वाहतूक सर्रासपणे सुरू असल्याने कुंडमळ्याप्रमाणे दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मामुर्डी-सांगवडे हा पवना नदीवरील पूल बांधण्यात येणार आहे. त्या कामास स्थायी समितीची मंजुरी तसेच, भूमिपूजन होऊन चार महिने उलटले तरी, अद्याप काम सुरू झालेले नाही. त्यामुळे नागरिक तसेच, वाहनचालक तेथील जुन्या लोखंडी धोकादायक पुलावरून ये-जा करीत आहेत. पुलावरून दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहने वाहतूक सर्रासपणे सुरू असल्याने कुंडमळ्याप्रमाणे दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मामुर्डी व सांगवडे भागास जोडणाऱ्या भागांसाठी तसेच, तेथून हिंजवडी येथील राजीव गांधी आयटी पार्ककडे जाण्यासाठी महापालिकेने पवना नदीवर पूल बांधण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी जलसंपदा विभागाच्या अभिप्राय घेऊन आवश्यक ते बदलीही करण्यात आले. त्यासाठी निविदाप्रक्रिया काढून ती अंतिम करण्यात आली.

मात्र, त्यात अनियमितता झाल्याचा आरोप करीत विरोधकांनी चौकशीची मागणी केली. त्यामुळे ती निविदाप्रक्रिया चौकशीचे कारण पुढे करून थांबविण्यात आली. त्यात काही महिन्याचा कालावधी गेला. अखेर त्या निविदेस 21 जानेवारी 2025 ला स्थायी समितीची मान्यता देण्यात आली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मामुर्डी-सांगवडे हा पवना नदीवरील पूल बांधण्यात येणार आहे. त्या कामास स्थायी समितीची मंजुरी तसेच, भूमिपूजन होऊन चार महिने उलटले तरी, अद्याप काम सुरू झालेले नाही. त्यामुळे नागरिक तसेच, वाहनचालक तेथील जुन्या लोखंडी धोकादायक पुलावरून ये-जा करीत आहेत.पूल उभारणीस 36 कोटी 66 लाख 10 हजार रुपये खर्च अपेक्षित असून, कामाची मुदत एक वर्ष आहे. ते काम ए. आर. कॅन्स्ट्रक्शनला देण्यात आले. त्यानंतर 6 फेब्रुवारी 2025 ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत या कामाचे भूमिपूजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. मात्र, चार महिने होऊनही अद्याप काम सुरू झालेले नाही. लोखंडी पुलाजवळील रिकाम्या जागेत संबंधित ठेकेदाराने लेबर कॅम्प उभा केला आहे. प्रत्यक्ष काम सुरू नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

या ठिकाणी जुना लोखंडी पूल आहे. तो धोकादायक झाला असून, येथून वाहतूक करू नये, याविषयीचा सूचनाफलकही लावला आहे. मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता महापालिकेने हे काम तातडीने सुरू करून नवीन पूल उभारावा, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.



### काम सुरू असल्याचा महापालिकेचा दावा

» मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता महापालिकेने हे काम तातडीने सुरू करून नवीन पूल उभारावा, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. पुलाच्या फाउंडेशनचे काम सुरू आहे. पावसामुळे कामात अडथळा येत आहे. मुदतीमध्ये पुलाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे महापालिकेचे सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार यांनी सांगितले.

# माळेगावच्या निवडणुकीत सत्ताधारी- विरोधक भिडले

## शेतकऱ्याच्या घामाला भाव नाही, गाईच्या दुधाला दर नाही!

**पुणे | प्रतिनिधी**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी अजित पवार गटाविरोधात गुरु- शिष्यांच्या तोफा धडाडत आहेत. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावागावात ज्येष्ठ सहकार तज्ञ चंद्रराव तावरे व रंजन तावरे यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शह देण्यासाठी गुरु शिष्याची जोडी पुन्हा एकदा मैदानात आरपारची लढाई लढत आहे.

माळेगाव कारखान्याची लढत आता अटीतटीच्या वळणावर पोहोचली आहे. सत्ताधारी अजित पवार गटाविरोधात तीन पॅनल मैदानात उतरले आहेत. चंद्रराव तावरे, रंजन तावरे यांचे पॅनल, शरद पवार गटाचे पॅनल, शेतकरी संघटनेचे पॅनल, अशी चौरंगी लढत होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील संचालकांचा पाच वर्षांचा लेखाजोखा मांडला जात आहे. तसेच अजित पवार यांनी जुने- नवीन उमेदवारांचा मेळ घालत सर्वसमावेशक पॅनल दिले आहे.

सत्ताधाऱ्यांनी केलेल्या चुकीच्या कामांवर बोट ठेवत अजित पवार यांच्यासह संचालक मंडळाचे वाभाडे काढले जात आहेत. कारखान्याच्या कर्जबाजारीपणाचा हिशोब सभासदांसमोर मांडला जात आहे. अजित पवार यांनी मीच चेअरमन होणार, हे घोषित का करावे लागले, याचे खुलासे केले जात आहेत. संचालक मंडळाच्या नाकर्तेपणामुळेच अजित पवारांवर ही वेळ आली असल्याचे सभासदांना सांगितले जात आहे. माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी मी चेअरमन होणार असल्याचे जाहीर केल्यानंतर या निवडणुकीत रंगत आली आहे. काही दिवसांत ही रंगत वाढत जाणार आहे. गुरु- शिष्यांची ही जोडी अजित पवार यांना कशा पद्धतीने शह देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सहकारमहर्षी चंद्रराव तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे आदर्श पद्धतीने कामकाज आम्ही केले. पारदर्शी व काटकसरीने कामकाज पद्धतीने माळेगावचे उदाहरण समोर ठेवले. त्यामुळे विरोधकांचा अपवाद वगळता सभासदांसह तर शेजारी कारखान्यांनाही माळेगाव कारखाना गुरु- शिष्यची जोडी म्हणजेच चंद्रराव तावरे व रंजन तावरे या नेतृत्वाकडे असावा, असे वाटत आहे. सभासदांना जास्तीचा भाव हवा आहे. सभासदांना विश्वास आहे. अण्णा- काका हेच जास्तीचा भाव देऊ शकतात. असे माजी चेअरमन रंजन तावरे यांनी स्पष्ट केले.




### तालुक्याची काय प्रतिष्ठा ठेवली

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री व्हायचे सोडून कारखान्याचे डायरेक्टर, चेअरमन व्हायला निघालेत, ही त्यांच्या व तालुक्याच्या प्रतिष्ठेला अशोभनीय आहे. तालुक्याचे नेते प्रतिष्ठेसाठी माळेगावची लढाई लढत आहेत. तुमची प्रतिष्ठा तुमच्याकडे ठेवा. प्रतिष्ठेसाठी माळेगावच्या सभासदांची धूळधाण करू नका, अशी टीका ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ चंद्रराव तावरे यांनी केली आहे.

### मी चेअरमन होणार ही दिशाभूल

» उपमुख्यमंत्री अजित पवार हेच माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत नीलकंठेश्वर पॅनलचा चेहरा बनले आहेत. संचालकाच्या चुकीच्या कारभारामुळे अजित पवार यांच्यावर ही वेळ आली आहे. सहकाराच्या पोटनियमानुसार ब वर्गातील विजयी उमेदवारास चेअरमन होता येत नाही. तरीदेखील मीच चेअरमन होणार, ही अजित पवार यांची घोषणा म्हणजे सभासदांची दिशाभूल आहे. माळेगावचा स्वाभिमानी शेतकरी सभासद त्यांच्यावर ही वेळ येऊ देणार नसल्याचे रंजन तावरे म्हणाले.

### खासगीचे षडयंत्र

» सहकारी साखर कारखान्यांवर कर्जाचा बोजा वाढवून कारखाने डबघाईला आणले जात आहेत. त्यानंतर त्यांचे लिलाव करून हेच कारखाने ही नेतेमंडळी विकत घेत आहे. माळेगाव कारखान्याची अवस्था देखील कर्जबाजारी आहे. ३२ कोटीच्या डिसलरीवर १०० कोटींचे कर्ज घेतले आहे. इतर बाबींसाठी देखील शेकडो कोटींचे कर्ज उचलले आहे. माळेगावचा छत्रपती करण्याचा डाव असून सभासदांनी वेळीच सावध भूमिका घ्यावी, असे आवाहन रंजन तावरे यांनी केले आहे.

# मुलांना आवडणाऱ्या वस्तू महाग ; शैक्षणिक साहित्यात 30 ते 40 टक्के वाढ

## शिरूर शहराच्या ऐतिहासिक वैभवाला आधुनिकतेची जोड देत आमदार कटके यांनी संकल्पनेतील शिरूर महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

यावर्षी सीबीएसई शाळा 16 जूनपासून तर 23 जूनपासून शासकीय तसेच अनुदानित, विनाअनुदानित शाळा सुरु होणार आहे. पण यंदा विद्यार्थ्यांच्या शालेय वस्तू खरेदी करताना पालकांची दमछाक होणार आहे. गेल्यावर्षी साधारणपणे 350 ते 400 रुपयांमध्ये मिळणारा वह्यांचा संच यंदा 500 रुपयांपर्यंत पोहोचला आहे. स्कूल बॅगच्या किमतीही वाढल्या आहेत. फॅशनेबल बॅग्जच्या किमतीमध्येही वाढ झाली आहे. वॉटर बॉटल्स 60 ते 80 रुपयांवरून 150 रुपयांपर्यंत पोहचल्या आहेत. वाहतूक खर्चात वाढ झाल्याने साहित्य महागल्याचे विक्रेत्यांकडून सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे कच्च्या कागदाच्या मालाचे भाव वाढल्याने शिक्षण साहित्यात 30 ते 40 टक्के वाढ झाली आहे. साहित्यात झालेल्या भाव वाढीमुळे पालकांना महागाईचा सामना करावा लागणार आहे. बाजारात नवनवीन नोटबुकसह विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य विक्रीसाठी दाखल झाले आहे. शालेय साहित्याबरोबरच मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे साहित्य देखील दाखल झाले आहे.

ग्रामीण भागातील आठवडे बाजारामध्येही शैक्षणिक साहित्य विक्रीस असून, पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विक्रीत विविध कंपन्यांची रस्सीखेच असून दर्जेदार सहित्यास ग्राहक आकर्षित होत असल्याचं चित्र बाजारात पाहायला मिळत आहे. नोटबुक कंपासपेटी, नोट पॅड, लहान मुलांना वापरात असलेली पाटी, पेन, दप्तर, अंकलिपी या वस्तूंना वाढती मागणी असल्याचे व्यापारी सांगतात. जरी शाळेत पुस्तके मोफत मिळणार असली तरी वह्यांचे नानाविध प्रकार बाजारात आले आहेत. बदलत्या काळानुसार मुलांना आवडणाऱ्या वस्तू देखील महाग झाल्या आहेत.



### ब्रॅण्डेड दप्तरांना मागणी

» बालकांच्या साहित्य विक्रीस उपलब्ध असल्याचेही विक्रेत्यांनी सांगितले. तर, शालेय साहित्यात भाववाढ झाली आहे.मात्र, मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून साहित्य घ्यावेचं लागेल असंही पालक म्हणत आहेत.यंदा बाजारात सुपरहिरो, विविध कार्टून थीम्स, वॉटरप्रूफ कापडांची आकर्षक बॅग विक्रीस उपलब्ध आहेत. ब्रॅण्डेड बॅग्जना मागणी असून त्यांचे दरही हजार रुपयांपर्यंत पोहचले आहे.

### दरवर्षीच नवीन पुस्तके

» पूर्वी विद्यार्थी जुने पुस्तक खरेदी करीत होते. यामध्ये मोठ्या प्रमाणात पैशाची बचत होत होती. आता शासकीय शाळांमध्ये मोफत पुस्तक मिळत असले तरी विविध इंग्रजी शाळांमध्ये दरवर्षी शाळांमधून नवीन पुस्तक पालकांना घ्यावी लागतात. अनेकवेळा अभ्यासक्रम बदलला नसला तरी काही शाळांमध्ये नवीन पुस्तक घेण्याची जणू सक्तीच केली जात असल्याचे दिसून येते.